ISSN No-2230-7850 Vol.1,Issue.IX/Sept 11pp.1-4

Research Paper

# '73 वी घटनादुरूस्ती व पंचायतराज व्यवस्था'.

प्रा.डॉ. हनुमंत भूमकर
ह्यराज्यशास्त्र विभाग प्रमुखह्
के.एस.के. महाविद्यालय़ बीड

प्रस्तावना ः
भारत एक संघराज्य असून भारतात त्रिस्तरीय शासन व्यवस्था आहे सर्वाच्च स्तरावर केंद्र सरकार प्रांतीय स्तरावर राज्य सरकार स्थानीक स्तरावर पंचायत राज व्यवस्थेचा समावेश होतो भारतात प्राचीन काळापासून पंचायत राज व्यवस्था अस्तित्वात आहेत. त्या वेळेस गावाचा कारभार गावकर्यांकडून केला जात असे. त्यामुळे खेडी स्वयंपूर्ण होती. गावचा कारभार आणि शासन व्यवस्था गावातील पोलिस पाटील महाली पाटील व सचिव म्हणून देशपांडे सरदेसाई यांच्या कडे गावचा पूर्ण कारभार होता त्यावर जहागिरदार व त्यानंतर सेनापती आणि सर्वाचा प्रमुख म्हणून राज राज्य कारभार पाहात असे परंतु काळाच्या ओघात राजेशाही नामशेष झाली त्यानंतर जगामध्ये लोकशाही शासन व्यवस्था उदय झाला भारतामध्ये चंद्रगुप्त मोर्या छत्रपती शिवाजी महाराज यांचा काळ सुंवर्ण काळ म्हणून ओळखला जातो. **1947** साली भारत देश स्वतंत्र झाला आणि लोकशाही विकेद्रिकरणाची गरज वाटु लागली त्यामुळे **26** जानेवारी **1950** रोजी भारताने प्रजासत्ताक राज्य व्यवस्थेचा पाया घातला आणि भारतीय राज्य घटना अमलात आणण्यास सुरवात केली त्यानंतर केंद्र आणि राज्य यांच्या मध्ये कामाचे वाटप झाले त्यामुळे केंद्रसुंची राज्यसुची समवर्ती सुची मध्ये कामाचे वाटप झाले **1992** साली **73** व्या व **74** व्याघटनादुरूस्तीने पंचायत राज व्यवस्थेला घटनात्मक दर्जा देण्यात आला तेव्हा पासून ग्रामीण भागाच्या विकासासाठी ग्रामपंचायत़ पंचायत समिति़ जिल्हा परिषद व शहरी विभागासाठी नगर पालिका आणि महानगर पालिका यांचा समावेश पंचायत राज व्यवस्थेत करण्यात आला.

**अर्थ व व्याख्या ः**

ब्रिटानिया विश्र्वकोष ः पंचायत राज व्यवस्थेचा म्हणजे पूर्ण राज्याऐवजी अंतर्गत दृष्टया प्रबंधित आणि लहान क्षेत्रात निर्णय घेणारी व त्यास कार्यान्वीत करणारी सत्ता होय.

**गिलक्राईस्ट ः**

पंचायत राज व्यवस्था या वास्तविक स्वरूपात सहायक संख्या आहे परंतु तिला मर्यादित क्षेत्रात कार्य करण्याचे स्वातंज्य आहे.

**73 वी घटनादुरूस्ती ः**

आज वर केलेल्या घटनादुरूस्ती पैकी **73** घटना दुरूस्ती महत्त्वाची आहे घटनेच्या **40** व्या कलमातील मार्गदर्शक तत्वापैकी एक तत्व अधिकार देणे हे आहे मात्र या तत्वाची अंमलबजावणी बंधनकारक नसल्याने सरकारचे याकडे दुर्लक्ष खेडे अविकसीत राहिली व विकेंद्रकरणाचे स्वप्न अपूर्ण राहिले याची जाणीव राज्य कर्त्याना झाली पंचायत राजलाच घटनात्मक दर्जा देण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान पी.व्ही. नरसिंहराव यानी **22** डिसेंबर **1992** ला हे विधेयक लोकसभेत मांडले़ **23** डिसेंबरला हे विधेयक राज्य सभेने मान्य केले **20** एप्रिल **1993** रोजी राष्ट्रपतीच्या संमतीने घटनात्मक दर्जा देण्यात आला कलम **243** मध्ये या विषयी तरतुद करण्यात आल्या **11** वे परिशिष्ट जोडून यास विषयी सुची समाविष्ट केले.

**73 व्या घटनादुरूस्ती मधील महत्त्वाच्या तरतुदी**

1. पंचायत राजव्यवस्थेला घटनात्मक दर्जा देण्यात आला ः

**73** व्या घटनादुरूस्तीने पंचायत राज व्यवस्थेला घटनात्मक दर्जा मिळाला **24** एप्रिल **1993** ला घटनादुरूस्ती होऊन हा काकयदा राजपत्रात प्रकाशित करण्यात आला **243** व्या कलमात या तरतुदी करून त्याला **11** वे परिशिष्ट जोडले कलम **40** मधील मार्गदर्शक तत्वांच्या अंमलबजावणी साठी ही घटना दुरूस्ती केली गेली.

**2. ग्रामसभेची तरतुद ः**

ग्रामीण भागात ग्रामसभा अधिकार व कर्तव्याची जोपासन करेन ते राज्य विधीमंडला द्वारे निश्चित केले जाईल वर्षात किमान दोन वेंलि ग्रामसभा घेण्यात यावी अशी तरतुद ग्रामसभेत बाबत घेण्यात आली ग्रामसभेला विधान सभेचा दर्जा देण्यात आला.

**3. त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्था ः**

प्रत्येक राज्यात ग्रामस्तऱ मध्यस्तऱ जिल्हास्तर याप्रमाणे ग्रामपंचायत़ पंचायत़ समिति़ जिल्हा परिषद अश्या प्रकारची रचना करण्यात आली वीस लाखापेक्षा कमी लोकसंख्या राज्यात मध्यस्तराची सुट देण्यात आली आहे व सर्व राज्यांना पंचायतच्या व्यवस्थेसंबंधी कायदा करण्याचे स्वातंत्रय देण्यात आले आहे.

**4. निवडणुकित आरक्षणाची तरतुद ः**

**73** व्या घटनादुरूस्तीने अनुसुचित जाती जमाती संबंधी सर्व पंचायत राज व्यवस्थेत आरक्षणाची तरतुद करण्यात आली त्यांच्यासाठी लोकसंख्याच्या प्रमाणात राखीव जागा ठेवण्यात आल्या. महिलांसाठी सुध्दा राखीव जागा ठेवण्यात आल्या. निवडणुकीमध्ये महिलांना **33**% आरक्षण देण्यात आले सध्या **50**% आरक्षण देण्याची घोषणा मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केली आहे त्यासाठी कॅबिनेट मध्ये तसा ठराव मांडूण तो मंजुर करून घेण्यात येईल असे सांगण्यात आले आहे. ही बाब **7** मार्च **2011** च्या दिवशी मुख्यमंत्रानी **8** मार्च रोजी होर्णाया जागतिक महिला दिना निमित्त्यांच्या अनुषंगाने केली आहे.

सरपंच़ स्भापति़ जिल्हा परिषद अध्यक्ष यांच्या साठी आरक्षण ः

ग्रामपंचायत़ पंचायत समिति़ जिल्हा परिषद या ग्रामीण भागातील त्रिस्तरीय रचनेमधील **73** घटना दुरूस्तीने सरपंच़ पंचायत समिती सभापति़ जिल्हा परिषद अध्यक्ष यांच्यासाठी अनुसुचित जाती – जमाती इतर मागासवर्गीय़ महिलांसाठी आरक्षण ठेवण्यात आले आहे.

**5. कार्यकालासाठी तरतुदी ः**

प्रत्येक पंचायत संस्थाचा कार्यकाल एक समान म्हणजेच **5** वर्षाचा असेल यापेक्षा जास्त राहणार नाही या संस्थानी निवडणुक कार्यकाल पूर्ण होण्या अगोदर व्हावी कार्यकाल संपण्यापूर्वी विर्सेजन केले असल्यास निवडणुका **6** महिन्यांच्या आत घेणे आवश्यक आहे. नविन ग्रामपंचायत उर्वरित काळासाठी कार्य करेल.

6. अपात्रते संबंधी तरतुदी ः

**73** व्या घटनादुरूस्तीने पंचायतराजचा संदस्याच्या अपात्रतेची तरतुद करण्यात आलेली आहे यानुसार एखादी व्यक्ती निवडणुकीच्या कोणत्याही कार्यकाल अपात्र ठरविली असेल तर ती व्यक्ती कुठल्याही पंचायतचा सदस्य होऊशकणार नाही यासंबंधी वाद उद्‌भवल्यास अधिकार्याची नियुक्ती करून राज्य विधीमंडळ कायदा करून ते सोडविल.

**7. कर आकारण्याचा़ गोळा करण्याचा अधिकार ः**

**73** व्या घटनादुरूस्तीत यासंबंधी अशी तरतुद केली आहे राज्यांचे विधीमंडळ कायदयाद्वारे पंचायत संस्थाना कर आकारण्याचा व वसूल करण्याचा हक्क देवु शकतात शिवाय राज्य सरकारच्या कराचे उत्पन राज्य सरकार व पंचायत राज मध्ये विभाजीत करण्यात येईल आणि ते कर पंचायत राज संस्था आकारेल व ते गोळा करण्यासोबतच त्याचा वापर करू शकेल.

**8. वित्त आयोगाची तरतुद ः**

**73** व्या घटनादुरूस्तीने अशी तरतुद केली आहे. पुरेशा आर्थिक स्त्रोतांची खात्री करण्यासाठी राज्यपाल प्रत्येक राज्यांत एक वर्षाच्या आत व नंतर दर **5** वर्षांनी एक वित्त आयोगाची स्थापना करेल. या वित्त आयोगाची बांधणी आणि त्यातील

कर्मचारी त्यांच्या पात्रता या संबंधी राज्य विधी मंडळ ठरवेल वित्त आयोग आर्थिक स्थितीचे परक्षिण करेल .

**9 . लेख व लेखा परीक्षणांची तरतुद ई**

73 व्या घटनादुरूस्तीने अशी तरतुद अशी केली आहे की पंचायत राज व्यवस्थेमधील विभीन्न स्तरावरील पंचायत संस्था संबंधी लेखा आणि लेख परीक्षणाची व्यवस्था राज्य व्यवस्था संबंधी कायदा करून तरतुद करेल .

**10 . निवडणुकीसंबंधी तरतुद ई**

73 व्या घटनादुरूस्तीने राज्यात निवडणुकीचे आयोजन मतदार यादया उमदेवार यादया निवडणुकीतील पक्षचिन्हे व सर्व निवडणुकीचे कार्य करण्यासाठी राज्यपाल एक निर्वाचन आयोग स्थापन करेल मुख्य निर्वाचन आयुक्तांची वेतन भत्ते सेवाशर्ती विधीमंडळाच्या कागदपत्राची अनुसरून राज्यपाल निर्धारित करेल व उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांप्रमाणे त्याला पदावरून दुर केले जाईल .

**11 . ग्रामीण विकास हे मुख्य उद्दिष्टे ई**

73 व्या घटना दुरूस्ती मुख्य उद्देश म्हणजे ग्रामीण स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा प्रदान करून त्यांना आर्थिक साधने निर्माण करून ग्रामीण व स्थानीक भागांचा विकास करावा हा आहे कारण कल्याणकारी राज्याचे उद्दीष्टे ग्रामीण विकास केल्या शिवाय साध्य होवू शकत नाही .

## संदर्भ सूची


1 . स्थानिक स्वराज्य संस्था ' डॉ . अर्जुन दर्शनकर

2 . स्थानिक स्वराज्य संस्था ' प्रा . यमलवाड सर

3 . योजना मासिक ' भारतीय शासन प्रकाशित

4 . स्पर्धा परिक्षा मासिक ' डॉ . आनंद पाटील

5 . पंचायत राज व्यवस्था ' डॉ . वंग

6 . लोकराज्य ' माहिती व जनसंपर्क संचालनालय मुंबई .